# • राष्ट्रीय कृषि विकास योजना •

राष्ट्रीय विकास परिषदेने ११ व्या पंचवार्षिक योजनेंतर्गत कृषि विकास दराचे ४ टक्के उद्दिष्ट निश्चित केले असून, सदर उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी केंद्र शासनाने **"राष्ट्रीय कृषि विकास योजना"** ही १०० टक्के केंद्र पुरस्कृत योजना जाहीर केली आहे. त्याअनुषंगाने राज्यात जलसंधारण विभागांतर्गत "शेततळे" कार्यक्रम सुरु केला असून, शेततळे कार्यक्रमाचा उद्देश संरक्षणात्मक सिंचन सुविधा उपलब्ध करुन देणे हा आहे.

केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत सन २००७-०८ पासून राज्यात संरक्षित सिंचनासाठी शेततळे योजना सुरु करण्यास मान्यता देण्यात आली असून, यामध्ये राज्यातील कापूस उत्पादन करणाऱ्या क्षेत्रातील व अवर्षण प्रवण क्षेत्रातील २५ जिल्ह्यांचा समावेश करण्यात आला आहे.

- शेततळ्याचे वर्षनिहाय उद्दिष्ट, वितरीत अनुदान व खर्च याची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| वर्ष | कार्यान्वित जिल्ह्यांची संख्या | उद्दिष्ट | काम पूर्ण संख्या | वितरीत निधी (रु. लाख) | खर्च (रु. लाख) |
|---|---|---|---|---|---|
| २००७-०८ | १६ | १७५०० | १७५०० | ८०००.०० | ८०००.०० |
| २००८-०९ | २१ | २१५०० | २१८७६ | १३६५२.१५ | १३६५२.०० |
| **एकुण** | | **३९०००** | **३९३७६** | **२१६५२.१५** | **२१६५२.००** |
| २००९-१० | २५ | ४०,००० | ३३९५२ | २२४००.०० | २२४००.०० |
| **एकुण** | **२५** | **७९,०००** | **७३३२८** | **४४०५२.१५** | **४४०५२.००** |

वरीलप्रमाणे एकुण ७९००० उद्दिष्टापैकी ७३३२८ इतकी शेततळ्यांची कामे पूर्ण झाली असुन, संपूर्ण रु.४४०.५२ कोटी प्राप्त निधी खर्च झाला आहे. शेततळे मूल्यांकनाची कार्यवाही चालू आहे.